समता चॅरीटेबल ट्रस्टचे मुखपत्र.

# समता वार्ता

मासिक

विश्वास + सुरक्षितता = समता

Making Learners Global
Samata International School

| वर्ष दुसरे – अंक पाचवा | मार्च २०१५ | **संपादक–** ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे | पृष्ठे ४+२ | किंमत ५ रु.

# समता पतसंस्थेचे अद्ययावत तंत्रज्ञानाने परिपूर्ण कार्यालय

## पतसंस्था चवळवळीचा दीपस्तंभ ठरणार–काका कोयटे

कोपरगांव–गतीमान काळाची पावले ओळखुन समता पतसंस्थेने अत्याधुनिक तंत्रज्ञानाकडे झेप घेतली आहे. समता पतसंस्थेचे अद्यावत तंत्रज्ञानाने परिपूर्ण कॉर्पोरेट पेपरलेस नुतन कार्यालय पंतसंस्थेच्या चळवळीत दीपस्तंभाची भूमिका बजावेल असे प्रतिपादन समता पतसंस्थेचे चेअरमन व महाराष्ट्र सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष श्री. ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी केले. ते समता नागरी पतसंस्था मर्यादित कोपरगांव मुख्य कार्यालयाचे नुतनीकरण शुभारंभ प्रसंगी बोलत होते. समता आपल्या ३ दशकांच्या वाटचालीत सतत नाविन्याच्या, प्रगत तंत्रज्ञानाचा ध्यास घेवून पुढे जात आहे, प्रगतीचे नवे नवे टप्पे गाठीत आहे.



समता नागरी सहकारी पतसंस्था पेपरलेस कार्यालय शुभारंभप्रसंगी बेसमेंट हॉलचे उद्‌घाटन करताना निशांत को–ऑप. क्रेडिट सोसायटी, अकोलेचे संस्थापक प्रकाशजी पोहरे, बुलढाणा अर्बनचे राधेशामजी चांडक, कार्यक्रमाचे अध्यक्ष जयंतरावजी ससाणे, दादाराव तुपकर, पीपल्स बँकेचे माजी चेअरमन श्री. रतनशेठ ठोळे, समता पतसंस्थेचे चेअरमन श्री. काका कोयटे व श्री. राजकुमार बंब व मान्यवर.

ते पुढे म्हणाले की, प्रत्येक आपत्तीला इष्टापत्ती समजणे हा पतसंस्थेचा स्थायीभाव आहे, म्हणूनच काल पासून सततधार पाऊस पडत असतानाही समताच्या पेपरलेस कार्यालयाचा शुभारंभ निर्विघ्नपणे पार पडला. काळाबरोबर धावण्यासाठी काळाची गती पकडणे गरजेचे आहे व त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अंगीकार करण्याची गरज आहे.

समता आणि प्रगती असे समीकरण असुन भारतातील पतसंस्था चळवळीत विविध नवनवीन संकल्पना प्रथम राबविणाचा मान समताकडे जातो. २८ वर्षापूर्वी सर्व सामान्यांना सेवेत दाखल झालेली समता पतसंस्था दमदार वाटचाल अत्याधुनिकतेशी हातमिळवणी करीत पेपरलेस बँकींगकडे सुरु असुन अत्याधुनिक तंत्रज्ञान परिपुर्ण पेपरलेस कार्यालयचा शुभारंभ दि. १ मार्च रोजी करण्यात आला. श्रीरामपुरचे माजी आमदार व श्री.साईबाबा शिर्डी संस्थानाचे माजी अध्यक्ष श्री.जयंतरावजी ससाणे यांचे अध्यक्षतेखाली हा सोहळा संपन्न झाला.

ग्राऊंड फ्लोअर बॅकींग हॉलचा शुभारंभ बुलढाणा अर्बन क्रेडीट सोसायटीचे संस्थापक श्री.राधेशामजी चांडक यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी बोलताना श्री चांडक म्हणाले की, गेली ३० वर्षे आम्ही सहकार चळवळीत सक्रीय आहोत. सहकार म्हणजे विश्वास अशी माझी सहकाराची व्याख्या आहे. एकदा विश्वास संपादन केला की, मागे वळुन पाहावे लागत नाही. फक्त दगड वा फक्त शेंदूर घेतला तर त्याला देवत्व येत नाही मात्र दगडाला शेंदूर फासला की त्यात देवत्व येते. कोपरगावच्या लोकांनी

पान २ वर

# समता पतसंस्था इतर पतसंस्थांसाठी एक आदर्श

## ना.राधाकृष्ण विखे पाटील

राहुरी–सर्वसामान्य माणसाला व्यापारात चालना मिळण्यासाठी समता पतसंसथेने केलेले काम कौतुकास्पद असून राहुरी सारख्या बाजारपेठेतही समता सारख्या पतसंस्थेची गरज होती. ही गरज ओळखून सुरु करण्यात आलेली राहुरी येथील समता पतसंस्थेची शाखा नक्कीच सर्वसामान्यांच्या गरजा ओळखून त्यांचा आधार बनण्याचे काम करेल असा विश्वास विधानसभेतील विरोधी पक्षनेते राधाकृष्णजी विखे पाटील यांनी व्यक्त केला ते समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या कोपरगावच्या राहुरी येथील ११ व्या शाखेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते.

उद्‌घाटन सोहळ्याचे अध्यक्षपदी माजी आ.चंद्रशेखर कदम होते तर अहमदनगर जिल्हा पतसंस्था स्थैर्यनिधी संघाचे अध्यक्ष श्री सुरेश वाबळे, जिल्हा उपनिबंधक दिगंबर हौसारे, सहाय्यक निबंधक एस टी कांदळकर, साई आदर्श मल्टीस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे याप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात विखे पाटील यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री आर आर पाटील यांच्या विविध आठवणींना उजाळा दिला. ते पुढे म्हणाले की काही वर्षापूर्वी महाराष्ट्रात पतसंस्था चळवळ बदनाम झाली होती मात्र काका कोयटे यांनी पुढाकार घेवून महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनची निर्मिती करून पतसंस्था चळवळ चांगल्यारितीने पुढे चालू ठेवण्याचे काम केले आहे. ठेवींना विमा संरक्षण मिळाल्याने ही चळवळ पूर्व स्थितीत आली आहे. समता पतसंस्थेच्या माध्यमातून उत्तम कारभार करून आपला आदर्श सर्वांसमोर ठेवण्याचे काम त्यांनी केले आहे. उभ्या महाराष्ट्रासामोर कोयटे यांनी आपला आदर्श ठेवला आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरून बोलताना माजी आमदार श्री. चंद्रशेखर कदम यांनी सांगितले की, विना सहकार नाही उद्धार हे घोषवाक्य घेऊन सहकाराचे मोठे जाळे विणले जात होते मात्र सहकारात अपप्रवृत्ती शिरल्याने विना संस्कार नाही सहकार हे घोषवाक्य निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे. संस्कारक्षम माणसे सहकारात येणे गरजेचे असून सहकाराचे चित्र बदलायचे असेल तर त्यासाठी संस्कारक्षम लोकांची गरज आहे काका कोयटे यांच्यामुळे पतसंस्था चळवळ पुढे जात असून त्यासाठी ते अभिनंदनास पात्र आहेत.

प्रस्ताविकात समता पतसंस्थेचे चेअरमन श्री ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी संस्थेच्या सांपतीक स्थितीची माहिती दिली. २८ वर्षापूर्वी स्थापन झोल्या समता पतसंस्थेच्या ठेवी २६० कोटी असल्याचे सांगताना थकीत कर्जदारांची मालमत्ता सरकारने विकत घेवून



राहुरी येथील समता पतसंस्थेच्या नूतन शाखेचे उद्‌घाटन करताना विरोधी पक्षनेते राधाकृष्णजी विखे पाटील, माजी आ. चंद्रशेखर कदम, श्री सुरेश वाबळे, श्री दिगंबर हौसारे, श्री एस.टी.कांदळकर, श्री. शिवाजीराव कपाळे, काका कोयटे व मान्यवर

त्यावर प्रकल्प राबवावेत अशी मागणीही त्यांनी केली.

कार्यक्रमास जेष्ठ जि.प. सदस्य सुरेश करपे, तानाजी धसाळ, शांतीनाथ आहेर, गणपतराव उंडे, अर्जुन पानसंबळ, कैलास तनपूरे, रमेश निमसे, प्रकाश पारख, बाळासाहेब उंडे, शिवाजी सोनवणे, शामराव निमसे, डॉ.भरत पैठणे, श्रीनिवास हरेल, विष्णू गीते, संभाजी तनपूरे, उपनगराध्यक्ष ईस्माईल शेख, रामभाऊ काळे यांचेसह समता पतसंस्थेचे चे. व्हा.चेअरमन श्री रामचंद्रजी बागरेचा, संचालक सर्वश्री जितेंद्रभाई शहा, मोहनशेठ झंवर, अरविंदभाई पटेल, निरव रावलिया, सौ. शोभाताई दरक, सौ.श्वेताताई अजमेरे, समताचे जन मॅनेजर सचिन भट्टड साहेब, असि.जन.मॅनेजर श्री मगनलाल बागमार यांचेसह शहरातील मान्यवर समता पतसंस्थेचे पदाधिकारी कर्मचारी व राहुरीचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

काकांना देव मानून त्यांचेवर विश्वास टाकला आहे. तर काकांनी अनेक नवेनवे उपक्रम राबवुन, समाजप्रती बांधीलकी ठेवून लोकांचा विश्वास सपादन केला आहे. सहकार चळवळी संदर्भात बोलताना त्यांनी सांगितले की, या चळवळीत जो टुटा वो कंकर और नही टुटा वो शंकर. काकांना मी शंकराची उपाधी देईन. काकांनी सहकार क्षेत्राला जे योगदान दिले आहे, जी दिशा दिली आहे, सहकार क्षेत्रात जे यश मिळवलं आहे त्यामुळे लोकांचा काकांवरील विश्वास अढळ आहे. ते पुढे म्हणाले की, केवळ पैसा कमावणे हा पतसंस्थेचा उद्देश नसावा तर सामाजिक बांधीलकीच्या जाणीवेतुन सर्व सामान्यांना उपेक्षितांना बाहेर काढणे हा सहकाराचा खरा अर्थ आहे.

बेसमेंट हॉलचा शुभारंभ निशांत को–ऑप क्रेडीट सोसायटी अकोलेचे संस्थापक श्री.प्रकाशजी पोहरे यांचे हस्ते करण्यात आला. या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, सहकार क्षेत्रातले निगर्वी, नि:स्पृह व्यक्तीमत्व असलेले काका पतसंस्था असो वा बिल्डर्ससारखा व्यवसाय काका अतिशय पारदर्शीपणे हाताळतात. पतसंस्था चालवणे खरे तर सुळावरची पोळी पण काकांनी पतसंस्था चळवळीत आपली संस्था एक आदर्शवत संस्था म्हणून उभी केली असुन ती नावारुपाला आलेली आहे. संस्थेच्या शुन्य टक्के एन.पी.ए. राखण्यासाठी मनावर कोणतेही दडपण न घेता कडक वागावे लागते समताने वसुली व्यवस्था कडकपणे राबवुन राज्यात एक आदर्श उदाहरण घालवून दिले आहे. काकांनी भविष्याची चाहुल घेवून पारदर्शक कारभार चालविण्यासाठी पेपरलेस बँकींग प्रणाली अवलंबिली आहे. भविष्याचा वेध घेवून चालणारासाठी प्रगतीचे दरवाजे सतत उघडे असतात हेच यावरुन दिसते.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना विश्वेश्वर सहकारी बँक पुणेचे चेअरमन श्री सुनीलशेठ रुकारी यांनी सांगितले की, काका कोयटे हे सहकार क्षेत्रात नावीन्यपूर्ण काम करणारे व्यक्तीमत्व म्हणून ओळखले जातात. सहकार क्षेत्रात अनंत अडचणी आहेत. परंतु अडचणींवर मात करण्याची क्षमता ज्यांच्यामध्ये आहे. तोच सहकार क्षेत्रात पुढे जातो. समता पतसंस्था इंटरनॅशनल लेव्हलची बनविण्यासाठीचा काकांचा प्रयत्न खूपच स्तुत्य आहे. सहकार क्षेत्रात वाटचाल करताना नेहमी अनेक अडचणी उभ्या राहतात. प्रसंगी कठोर निर्णय घ्यावे लागतात. महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्षपद भूषवतांना या सर्व गोष्टींना तोंड देत समता पतसंस्था प्रगती पथावर नेण्यासाठी काकांनी केलेले प्रयत्न अत्यंत प्रभावी असून ते इतरांसाठी प्रेरणादायी आहे.

संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे संचालक नितीनदादा कोल्हे याप्रसंगी बोलतांना म्हणाले की, समता पतसंस्थेचे अद्ययावत तंत्रज्ञानाने सुसज्ज कार्यालयात झालेले रुपांतर पाहताना काकांचा मित्र असल्याचा मला अभिमान वाटतो. समता पतसंस्थेच्या वाटचालीचा मीही एक साक्षीदार आहे. आदर्शवत पतसंस्था कशी असावी हे काकांनी स्वत:च्या संस्थेच्या उदाहरणाने दाखवून दिले आहे. काकांच्या कामाचा, व्यापांचा मला चांगला अभ्यास आहे. या सर्व व्यापात काका सर्व जुन्या–जाणत्या ज्येष्ठांची समकालीन तसेच उदयोन्मुख व्यक्तीचीही तेवढ्याच आत्मीयतेने ओळख ठेवतात. ही बाब वाखाणण्यासारखी आहे.

समता पतसंस्थेचे संस्थापक सदस्य श्री रामबिलासजी मुंदडा यांनी पतसंस्थेत करण्यात आलेल्या अत्याधुनिक सोयी–सुविधांची तारीफ करताना समता महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्था म्हणून ओळखली जात असल्याचा आपल्याला सार्थ अभिमान असल्याचे सांगतांना समता पतसंस्थेला काका कोयटे यांचे नाव देण्याची सूचना मांडली आणि समता आणखी पुढे जावून नवनवी शिखरे पादाक्रांत करील असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी किऑक्स सुविधेचा शुभारंभ संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक श्री नितीनदादा कोल्हे यांच्या हस्ते, विविध व्यवसाय शुभारंभ विश्वेश्वर सहकारी बँक पुणेचे चेअरमन श्री सुनीलशेठ रुकारी यांचे हस्ते, व्यवसाय मार्गदर्शन केंद्राचा शुभारंभ महाराष्ट्र राज्य पतसंस्था–फेडरेशनचे प्रशिक्षण विभाग प्रमुख श्री दादाराव तुपकर यांचे हस्ते, आयकर, सल्ला केंद्र शुभारंभ अेडीसीसी बँक अहमदनगरचे माजी कार्यकारी अधिकारी श्री.डी.आर. मंत्री साहेब यांचे हस्ते कॉम्प्युटर अवरनेस सेंटरचा शुभारंभ अ.नगर जिल्हा स्थैर्यनिधी सहकारी संघाचे उपाध्यक्ष श्री वसंतजी लोढा यांचे हस्ते ई–डॉक्युमेंट लॉकर सुविधा शुभारंभ अ.नगर जिल्हा स्थैर्यनिधी सहकारी संघाचे श्री.सुरेशजी वाबळे यांचे हस्ते, रिकव्हरी कंट्रोल रुमचा शुभारंभ संत नागेबाबा पतसंस्थेचे चेअरमन श्री कडुभाऊ काळे यांचे हस्ते, फॉरेन्सिक ऑडीट कंट्रोलरुमचा शुभारंभ महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे उपाध्यक्ष श्री राजुदास जाधव यांचे हस्ते, रेकॉर्ड रुमचा शुभारंभ समता पतसंस्थेचे संस्थापक रामबिलासजी मुंदडा यांचे हस्ते, समता अभ्यासिकेचा शुभारंभ समता पतसंस्थेचे संस्थापक सुगनचंदजी बंब यांचे हस्ते, डेबीट क्रेडीट कार्ड शुभारंभ मा.श्री.भास्करराव कोठावदे यांचे हस्ते, मिनरल वॉटर पुरवठा शुभारंभ तसेच समता सहकार सभागृहाचा शुभारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री जयंतजी ससाणे यांचे हस्ते करण्यात आला तर समता पतसंस्थेची वाटचाल ३ दशकांची या पुस्तिकेचे प्रकाशन वीरशैव दर्शन संचालक श्री शरदआप्पा हापसे यांचे हस्ते करण्यात आले.

या शुभारंभ सोहळ्यात उपरोक्त मान्यवरांसह समता पतसंस्थेचे व्हा.चेअरमन रामचंद्रजी बागरेचा, संचालक सर्वश्री. जितेंद्रभाई शहा, मोहनचंदजी झंवर, अरविंदभाई पटेल, गुलाबचंदजी अग्रवाल, राजकुमारजी बंब, चांगदेवजी शिरोडे, संदीप कोयटे, कचरु मोकळ, निरव रावलिया, सौ.शोभाताई दरक व सौ.श्वेताताई अजमेरे यांचेसह विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार व समता परिवाराचे सदस्य उपस्थित होते हा सोहळ्याचे यशस्वीतेसाठी समता पतसंस्थेचे जनरल मॅनेजर श्री सचिनजी भट्टड यांचे सह अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी व समता इंटरनॅशनल स्कुलच्या शिक्षकवृंदांने विशेष परिश्रम घेतले.

संपूर्ण सोहळ्याचे सुत्रसंचालन महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशनच्या प्राचार्य सौ.सुरेखा लवांडे यांनी केले. समता पतसंस्थेचे संचालक श्री राजकुमारजी बंब यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## हार्दिक अभिष्टचिंतन वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

**मार्च २०१५**

| सभासदाचे नाव | जन्मतारीख |
|---|---|
| सौ.राणी प्रशांत जंगम | १ मार्च |
| श्री.कांतीलाल हरलालजी जोशी | १ मार्च |
| श्री.चंद्रकांत शिंदे (मे.कृष्णा प्रिंटर्स) | १ मार्च |
| श्री.सुहासराव पंढरीनाथ बोरावके | २ मार्च |
| सौ.कुंदाताई बाबासाहेब जंगम | २ मार्च |
| श्री.दत्तात्रय विष्णुपंत जोर्वेकर | २ मार्च |
| सौ.संगीताताई भाऊसाहेब साळुंके | २ मार्च |
| श्री.जितेंद्रभाई कांतीलालजी शहा | २ मार्च |
| सौ.ललिताबाई नंदकिशोरशेठ अग्रवाल | ३ मार्च |
| श्री.नंदकुमार बाबूराव बाबळे | ३ मार्च |
| श्री.भास्करभाई कांतीलालजी व्यास | ३ मार्च |
| श्री.शिवनारायण आनंदरामजी अट्टल | ७ मार्च |
| श्री.संतोष तुकाराम राऊत | ८ मार्च |
| श्री.अशोक प्रेमसुखजी दरक | ८ मार्च |

| सभासदाचे नाव | जन्मतारीख |
|---|---|
| सौ.आरती महेश नावंदर | ९ मार्च |
| श्री.प्रकाशशेठ काशिनाथ शिरोडे | १० मार्च |
| श्री.मधुकर दुर्गाप्पा साखरे | १० मार्च |
| श्री.अशोकशेठ गिरिजाशंकर जानी | ११ मार्च |
| श्री.विनायकराव लक्ष्मणजी आगलावे | १२ मार्च |
| सौ.मीना रामेशचंद्र लाहोटी | १२ मार्च |
| श्री.रामचंद्रजी मोतीलालजी बागरेचा | १२ मार्च |
| श्री.सुनील ईश्वरचंद बेदमुथा | १५ मार्च |
| सौ.नलिनी दिनकर फुलसौंदर | १५ मार्च |
| सौ.स्मिता विवेक जोशी | १६ मार्च |
| सौ.वरुणा सुनील वैद्य | १६ मार्च |
| श्री.शेखरशेठ रामबिलासशेठ मुंदडा | १७ मार्च |
| श्री.विजयशेठ श्रावणशेठ नानकर | १७ मार्च |
| श्री.श्रीरामभाऊ पन्नालाल डागा | १७ मार्च |

| सभासदाचे नाव | जन्मतारीख |
|---|---|
| सौ.सीमा मंगेश साखरे | १८ मार्च |
| श्री.मोहनलाल आनंदराव झंवर | २० मार्च |
| सौ.स्वाती दिलीप डागा | २० मार्च |
| श्री.भरतकुमार मदनलालशेठ बंब | २१ मार्च |
| श्री.शिवनाथ दुर्गाप्पा साखरे | २३ मार्च |
| सौ.कल्पना दिलीपशेठ धाडीवाल | २३ मार्च |
| कु.सायली सोमनाथआप्पा साखरे | २४ मार्च |
| श्री.मधुकर लक्ष्मण अमृतकर | २६ मार्च |
| श्री.प्रशांत रविंद्रआप्पा साखरे | २८ मार्च |
| श्री.ईश्वर राजाराम आंधळकर | २९ मार्च |
| श्री.नवीनचंद पूनमचंद संचेती | २९ मार्च |
| श्री.पंडीत हरीभाऊ वाणी | ३० मार्च |
| सौ.प्रिया पवन गिरमे | ३१ मार्च |
| सौ.सुरेखाताई प्रकाशशेठ मुंदडा | ३१ मार्च |
| श्री.संदीप शिवदास डागा | ३१ मार्च |
| सौ.सुरेखा प्रकाश मुंदडा | ३१ मार्च |

**शुभेच्छुक : समता परिवार, कोपरगांव**

## वाढदिवसानिमित्त हार्दिक अभिष्टचिंतन सर्वांना सुख लाभावे तशीच आरोग्यसंपदा



फुलसौंदर सुजल १ मार्च | वाबळे प्रसाद २ मार्च | देशमुख शांभवी २ मार्च | हजारे संतोषी २ मार्च | होले आर्य ४ मार्च | क्षीरसागर तेजस ४ मार्च | भोसले अद्वैता ६ मार्च | गोलेचा पूर्वा ६ मार्च | घुमरे यश ६ मार्च



कलंत्री अथर्व ८ मार्च | ठोळे तिर्थ ९ मार्च | शिरोडे आहना ९ मार्च | जपे अनुष्का १० मार्च | साखरे समर्थ ११ मार्च | अरोरा विश्वनाथ ११ मार्च | बंब प्रथम १२ मार्च | वाणी संस्कार १३ मार्च | मुंजे मुक्ता १४ मार्च



बारहाते अन्वय १४ मार्च | बोथरा जिया १४ मार्च | भावसार अथर्व १४ मार्च | गोलेचा ओम १५ मार्च | भुसारे समर्थ १५ मार्च | दवंगे वैष्णवी १५ मार्च | पठारे मिलींद १७ मार्च | बारहाते आदिती २० मार्च | लोढा आदिती २० मार्च



दुबे अन्वी २० मार्च | मुंदडा पराग २४ मार्च | राज अनया २४ मार्च | अजमेरा दर्शिल २६ मार्च | गवारे जय २९ मार्च | जगताप पार्थ २९ मार्च | नरवाडे सिद्धांत २९ मार्च | उकीरडे आदित्य २९ मार्च | जगताप श्रृती २९ मार्च



कोठारी अर्निशा ३० मार्च | महाजन चिंतना ३० मार्च | जगताप सिद्धी ३० मार्च | आढाव जयेश ३० मार्च | भुसारे वृषभ ३१ मार्च | साई शिवानी २३ मार्च

**शुभेच्छुक :**
**समता परिवार, कोपरगांव**

# चित्रकला स्पर्धा परिक्षेत समता इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे सुयश

कोपरगाव–समता इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनातर्फे घेतल्या जाणाऱ्या एलीमेंटरी परिक्षेत तसेच सकाळ वृत्तपत्र समूहाच्या वतीने संपूर्ण राज्यात आयोजीत केल्या जाणाऱ्या सकाळ बालचित्रकला स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. मुलांच्या भविष्यातील करिअरसाठभ महत्त्वपूर्ण असलेली एलिमेंटरी परिक्षा समता स्कूलच्या १८ विद्यार्थ्यांनी दिली. ए ग्रेड, बी ग्रेड व उत्तीर्ण अशा विविध स्तरावर विद्यार्थी यशस्वी झाले.

कु. सुनीता सुनील बंगाळ, कु. दिशा नितीन गांधी या ७ वीतील व कु.खुशी राहुल सांड या आठवीतील विद्यार्थिनींना ए ग्रेड प्राप्त झाली. कु.तान्या अमेसर, कु. शुभम मांगलेकर इयत्ता आठवी यांना बी ग्रेड मिळाली. परिक्षेस बसलेले सर्व १८ विद्यार्थी सप्टेंबर २०१५ मध्ये होणाऱ्या इंटरमिजीएट परिक्षेसाठी पात्र ठरले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शासनातर्फे प्रमाणपत्रे देण्यात आली.

तसेच सकाळ बालचित्रकला स्पर्धेतही समता इंटरनॅशनल स्कूलचे ९० विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेत समता स्कूलची विद्यार्थीनी कु. पौरवी रहाणे औरंगाबाद विभागात ब गटात द्वितीय क्रमांकाची विजेती ठरली तर कु. तनिष लक्ष्मण मोहन याने ब गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला क गटात आदित्य उंबरकर व तन्वी वाबळे यांना उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त झाला सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना चित्रकला शिक्षक श्री.समाधान काकड यांचे मार्गदर्शन लाभले. उपरोक्त दोन्ही परीक्षा स्पर्धेसाठी सकाळी त्यांनी विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली.

परीक्षा व स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालिका सौ.स्वाती संदीप कोयटे, प्राचार्य श्री.गोकुळ महाजन, उपप्रचार्य सौ.लिसा बर्धन व शिक्षकांनी अभिनंदन केले.



आदित्य उंबरकर



आर्य होले



दिशा गांधी



पौरवी रहाणे



खुशी सांड



संस्कृती बागल



शुभम मांगलेकर



तनिष मोहन



तन्वी वाबळे



तान्या अमेसर

**सर्वांचे समता परिवारातर्फे अभिनंदन**

## समता पतसंस्थेने घडविली सावली अनाथाश्रमाच्या बालकांना शिर्डी सफर

कोपरगाव-उपेक्षित, वंचित, अनाथ बालकांच्या जीवनातही थोडे आनंदाचे क्षण उपलबध करून देण्याच्या सदहेतूने समता पतसंस्थेच्या पेपरलेस कार्यालय शुभारंभदिनी अहदनगरजवळीत केडगांव येथील संकल्प प्रतिष्ठानातर्फे चालविण्यात येत असलेल्यासावली अनाथाश्रमातील ५० बालकांसाठी समता पतसंस्थेने शिर्डी सहलीचे आयोजन केले होते. अनाथाश्रमातील या मुला-मुलींना समता इंटरनॅशनल स्कूल बसद्वारा शिर्डी येथे आणण्यात आले. शिर्डीच्या साईबाबांचे दर्शन घेतल्यानंतर सर्व मुलांना वॉटरपार्कमध्ये नेण्यात आले. वॉटरपार्क मधील खेळाचा मनमुराद आनंद लुटल्यानंतर सर्व मुलांना समता इंटरनॅशनल स्कूलची सफर घडविण्यात आली. सायंकाळी सर्व मुलांना समता पतसंस्थेत आणण्यात आले. मुलांनी समता पतसंस्थेचे नवे कार्यालय पाहिले तसेच माहिती घेतली त्यानंतर त्या मुलांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सर्वप्रथम सावली अनाथाश्रमाचे प्रमुख श्री.नितीन बनसोडे सरांनी समता पतसंस्थेचे चेअरमन श्री.ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांचे अनाथ बालकांना १ दिवस आनंदात घालविण्यासाठी दिलेल्या विशेष सेवेबद्दल मन:पूर्वक आभार मानताना सांगितले की, सावलीत येवून आपण मुलांना भेटल्याबद्दल आम्हाला मनस्वी आनंद झाला. असून तुमच्यात आम्हाला वटवृक्षाची सावली त्याचबरोबर भक्कम आधाराची अनुभूती जाणवली.

आमच्या मुलांना जो आनंद उपलब्ध दिला त्याबद्दल आम्ही खूपच आभारी आहोत. यावेळी एका छोट्या बालिकेने प्रबोधनपर कथा सादर केली. सर्व मुलांना समता पतसंस्थेचे चेअरमन काका कोयटे व सौ.सुहासिनीताई कोयटे यांचे हस्ते नवीन कपडे तसेच मिष्टान्न भोजन देण्यात आले. सदर प्रसंगी संस्थेचे संचालक सर्वश्री जितेंद्रभाई शहा, अरविंदभाई पटेल, राजकुमार बंब, संदीप कोयटे, उपनगराध्यक्ष रविंद्र पाठक, समताचे जनरल मॅनेजर सचिन भट्टड, श्री जनार्दन कदम सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जन मॅनेजर मगनलाल बागमार साहेब यांनी केले. या प्रसंगी त्यांनी सादर केलेली देव-देवत्व ही कविता अतिशय प्रभावी होती.



सावली अनाथाश्रमातील बालकांना कपडे वाटप करताना सौ. सुहासिनीताई कोयटे, सोबत काका कोयटे, सावलीचे प्रमुख नितीन बनसोडे, अरविंदभाई पटेल, श्री. बागमारसाहेब व मान्यवर

## स्व.दादाप्पा खंडाप्पा कोयटे विद्यालयाचे स्नेहसंमेलनात २०० विद्यार्थ्यांच्या समुहाद्वारा गीतरामायण ऋणानुबंध नृत्यनाटीका सादर



स्व.दादाप्पा खंडाप्पा कोयटे विद्यालयात गीतरामायण ऋणानुबंध सादर करताना बालकलाकार

कोपरगांव-येथील समता नागरी सहकारी पतसंस्था मर्या व निवारा मित्रमंडळ संचलित स्व.दादाप्पा खंडाप्पा कोयटे विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. निवारा मित्रमंडळाच्या गणेशस्टेजवर ग.दि.माडगुळकर लिखीत व सुधीर फडके यांचे गायनाने अजरामर झालेल्या गीतरामायणावर आधारीत गीतरामायण ऋणानुबंध ही नृत्यनाटिका २०० विद्यार्थ्यांच्या समुहाने एकाच वेळी ३ स्टेजवरुन सादर केली.

सादर करणारे होते सामान्य कुटूंबातील विद्यार्थी स्व.दादाप्पा कोयटे विद्यालयाच्या अध्यक्षा सौ.सुहासिनीताई कोयटे यांच्या संकल्पनेतून विद्यालयातील विद्यार्थीवर्गांवर सुसंस्कार व्हावे व त्यांना नात्यांची महती कळावी या हेतुने गीतरामायण ऋणानुबंध नृत्यनाटीकेचे आयोजन करण्यात आले होते. खुपच मनोवेधक व आगळ्यावेगळ्या या नाटीकेत एकाचवेळी अयोध्यानगरी, राम राज्याभिषेकासाठी आनंदोत्सव साजरा करणारे अयोध्यावासी व त्याचवेळी पित्याच्या आदेशाचे पालन करीत वनवासाला निघालेले राम लक्ष्मण सीता अशी दृष्ये नृत्य नाट्यासह सादर होत होती. या संपुर्ण नृत्यनाटीकेचे नियोजन समता इंटरनॅशनल स्कुलच्या विभावरी नगरकर व स्व.खंडाप्पा कोयटे विद्यालयातील शिक्षकवृंदाने केले होते. नृत्याविष्कार समता इंटरनॅशनल स्कूलचे नृत्यप्रशिक्षक श्री.विनोद वाघमारे यांनी बसवुन घेतले. या संपूर्ण सोहळ्यासाठी कोयटे विद्यालयातील शिक्षक व कर्मचारी तसेच समता स्कुलचे श्री.विजय घाडगे व सहकाऱ्यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले.

स्नेहसंमेलन सोहळ्याचे अध्यक्षस्थानी समता पतसंस्थेच्या संचालिका सौ.शोभाताई दरक होत्या. तर पारितोषिक वितरण समता पतसंस्थेच्या संचालिका सौ.श्वेताताई अमजेरे तसेच सौ.पुष्पलता दिक्षीत, सौ.मंगल गवारे, सौ.शोभा पवार, सौ.आशा पवार, सौ.प्रतिभा गायकवाड, या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमास समता पतसंस्थेचे चेअरमन श्री.ओमप्रकाश दादाप्पा तथाकाका कोयटे, श्री.सुरेंद्रजी व्यास श्री.बी.आर.कोते सर श्री.खानापुरे सर, सौ.सुहासिनीताई कोयटे, सौ.मिनाताई व्यास, सौ.ज्योत्सनाबाई पटेल, समता इंटरनॅशनल स्कुलच्या मॅनेजंग ट्रस्टी सौ.स्वाती संदीप कोयटे, व उपप्राचार्य सौ.लिसा बर्धन, यांची प्रमुख उपस्थिती होती निवारा परिसरातील मान्यवर, नागरिक व पालक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ.सुहासिनीताई कोयटे यांनी केले तर सुत्रसंचालन विभावरी नगरकर यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्व.दादाप्पा खंडाप्पा कोयटे विद्यालयातील शिक्षकवृंद व कर्मचारी तसेच समता इंटरनॅशनल स्कुलच्या शिक्षक कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## समता नागरी सह पतसंस्था येवला शाखेत शुभारंभ ठेवयोजना, लकी ड्रॉ : श्रेया जवळीकर भाग्यशाली विजेती

कोपरगाव-समता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित कोपरगावच्या येवला शाखा कार्यालयाचे २० जुलै २०१४ रोजी जंगली महाराज कमान येथील बाजारपेठेत स्थलांतर झाले. या स्थलांतर सोहळ्यानिमित्त समता पतसंस्थेने ग्राहकांसाठी शुभारंभ ठेव योजना जाहीर केली होती. २० जुलै २०१४ ते ३१ डिसेंबर २०१४ च्या कालावधीसाठी ही योजना राबविली गेली. शुभारंभ ठेव योजनेत येवला शहर व तालुक्यातील ग्राहकांच्या भरघोस प्रतिसाद लाभला. सदर योजनेअंतर्गत ग्राहकांनी समताच्या येवला शाखेला ६ कोटी ८१ लाख रुपये इतक्या ठेवी दिल्या. शुभारंभ ठेव योजनेसह चांगल्या परताव्यासह आकर्षक बक्षीसयोजना जाहीर करण्यात आली होती.

दि. ११ फेब्रुवारी रोजी शुभारंभ ठेव बक्षीस योजनेच्या लकी ड्रॉ येवला येथील प्रसिद्ध व्यंगचित्रकार श्री.प्रभाकरजी झळके उद्योगपती श्री.सुशीलचंद्र गुजराथी, श्री.दिलीप गिरिजप्पा तक्ते, श्री भरत पटेल, श्री.शैलेश गुजराथी व श्री अनिलकुमार पटेल या मान्यवर पंचाच्या देखरेखीत व तमाम ठेवीदारांच्या उपस्थितीत काढण्यात आला. या योजनेत प्रथम क्रमांकाच्या १ लाखाचे सोने या बक्षीसाची मानकरी ठरली कु.श्रेया संदीप जवळीकर, द्वितीय विजेत्या श्रीमती सुमन जनार्दन जोशी यांना ७५ हजारांचे सोने व तृतीय विजेता श्री योगेश मणिलाल गुजराथी यांना ५० हजारांचे सोने अशी बक्षीसे देण्यात आली. श्री अरविंद प्रल्हाद गुजराथी व श्री.भालचंद्र प्रभाकरसा कुक्कर यांना हिरो मोटारसायकल आणि श्री दिलीप फतेसिंग परदेशी व सौ. उज्वला सुभाष अट्टल यांना टीव्हीएस झुझुकी तर श्री रविंद्र नारायण कुलकर्णी यांना व्हिडीओकॉन डबल डोअर फ्रिज ही बक्षीसे देण्यात आली.

लकी ड्रॉ सोहळ्यास समता पतसंस्थेचे चेअरमन श्री ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे, व्हा.चेअरमन, जितेंद्रभाई शहा, संचालक अरविंदभाई पटेल, जनरल मॅनेजर सचिन भट्टड, असि.जन.मॅनेजर मगनलाल बागमार तसेच शहरातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समता पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयातील तसेच येवला शाखेतील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतल्याचे समताच्या येवला शाखेचे शाखाधिकारी श्री विश्वास सावरगावकर यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री बागमार साहेबांनी केले.



प्रथम पुरस्कार प्रदान करताना उद्योगपती श्री सुशीलचंद्र गुजराथी, व्यंगचित्रकार प्रभाकर झळके, समता पतसंस्थेचे चेअरमन काकासाहेब कोयटे, श्री.भरत धुमाळ, श्री.चंद्रकांत तक्ते मागे शैलेशभाई गुजराथी, अरविंदभाई पटेल, भरतभाई पटेल, जितेंद्रभाई शहा इत्यादी.

'समता वार्ता' हे पत्र प्रकाशक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे ''समता चॅरीटेबल ट्रस्ट'' कोपरगाव यांचेसाठी मुद्रक किरण चंद्रकांत माळी यांनी शिवम् ग्राफिक, निवारा कॉर्नर, कोपरगाव जि अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून समता पतसंस्था कोपरगाव ता. कोपरगाव जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले संपादक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे मो. ९८२२४३५२५५/९३७१३३३५५५, सहसंपादक: बेबी मनोहर मराठे, ऑफिस फोन ०२४२३ २२५५५७/८
ई-मेल : samtavarta@gmail.com (या अंकामध्ये छापलेल्या मजकुरांशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. वादविवाद कोपरगाव न्यायकक्षेत) RNI NO. MAHMAR43417 /13-TC

# बदलत्या जगाबरोबर समता ही बदलली आहे
# विश्वास+सुरक्षितता = समता हे ब्रीदवाक्य सार्थ करण्यासाठी

**गेल्या दशकांच्या वाटचालीत समता पतसंस्था सतत नावीन्याचा प्रगत तंत्रज्ञानाचा आधुनिक जगासमवेत. हातमिळवणी करण्याचा ध्यास घेवून पुढे जात आहे, प्रगतीचे नवे नवे टप्पे गाठीत आहे. समता आणि प्रगती असं समीकरण असून भारतातील पतसंस्था चळवळीत विविध नवनवीन संकल्पना राबविण्याचा मान समताकडे जातो २८ वर्षापूर्वी १० X २० एवढ्या छोट्या जागेत केवळ १ लाख ११ हजार ९०० रुपये एवढ्या भाग भांडवलावर सुरु झालेली समता पतसंस्था आज महाराष्ट्रातील प्रतिथयश पतसंस्था म्हणून ओळखली जाते. स्पर्धेत टिकून रहाण्याबरोबरच सतत शिखरस्थानी रहायचं असेल तर जिंकण्याची जबरदस्त इच्छा सतत तेवत असावी लागते आणि जिंकायची इच्छा ठेवूनच समता अस्तित्वात आली. संस्थापक संचालकाच्या जबरदस्त इच्छेमुळे समताने आज महाराष्ट्रात आपले आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे. सुलभरित्या वित्तपुरवठा करताना ग्राहकांना अत्याधुनिक सुविधांचा उपलब्ध करून त्यांच्या ठेवींवर विशेष लाभ उपलब्ध करून दिला जात असल्याने समता व ग्राहक यांचे नाते सुदृढ झालेले आहे. ग्राहकांच्या सेवेसाठी, त्यांच्या आयुष्याला समृद्धीची दिशा देण्यासाठी आणि ग्राहकांचा विश्वास आणखी दृढ करण्यासाठी समता अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज झाली आहे.**

## राबविण्यात येणाऱ्या नवनवीन संकल्पना

**१) कोअर बँकिंग :** समताच्या सर्व शाखांचे व्यवहार कोअर बँकिंग प्रणालीद्वारा एकमेकांशी जोडण्यात आले असून आता समताचा ग्राहक समता पतसंस्थेच्या ११ शाखापैकी कोणत्याही शाखेत जावून आपले आर्थिक व्यवहार करू शकेल तसेच समताच्या कोणत्याही शाखेत होणारा प्रत्येक व्यवहार एकमेकांशी जोडला जाईल व या प्रणालीद्वारा सर्व व्यवहारांचे नियंत्रण मुख्य कार्यालयातून केले जाईल

**२) फॉरेन्सिक ऑडीट :** प्रत्येक शाखेत होणारा व्यवहार कंट्रोलरूपममधून प्रत्येक मिनिटाला तपासला जाईल. विशेष म्हणजे फॉरेन्सिक ऑडीट या आंतरराष्ट्रीय सिस्टिमद्वारा अपहार वा गैरव्यवहार होणाऱ्या व्यवहारांवर त्याच मिनिटाला नियंत्रण ठेवणे शक्य होईल संपूर्ण महाराष्ट्रात बँकींग चळवळीत अशाप्रकारची यंत्रणा विकसित करणारी समता ही पहिली पतसंस्था आहे.

**३) एटीएम आणि व्हिसाकार्ड :** एटीएम सेवेसोबतच समताने व्हिसाकार्ड सोय उपलब्ध करून देवून आपल्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. समताचे एटीएम कार्ड महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील दीड लाख एटीएममध्ये चालू शकेल. रत्नाकर बँकेच्या सहकार्याने ही योजना राबविण्यात येत आहे. अत्याधुनिक तंत्र प्रणालीचे शिखर गाठण्यास समता सज्ज आहे.

**४) ई डॉक्युमेंट तंत्र :** ई डॉक्युमेंट लॉकर सुविधा या सुविधे अंतर्गत ग्राहकांच्या महत्त्वपूर्ण कागदपत्रांचे जतन करण्यात येणार असून महत्त्वपूर्ण कागदपत्रे व इतर माहिती पाहिजे तेव्हा पाहिजे त्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येईल. जसे जन्म मृत्यू दाखले, शाळा सोडल्याचा दाखला, जन्मकुंडल्या, लग्नपत्रिका, पासपोर्ट, स्थावर मालमत्तेची खरेदी विक्री पत्रे सिटी सर्व्हे किंवा सातबारा उतारे आदी महत्त्वपूर्ण कागदपत्रे तसेच कुटूंबासंबंधी सर्व माहिती फोटो, व्यवसाय नातेवाईक आदी पारंपारिक माहिती संगणकात पिढ्यानपिढ्या उपलब्ध करून देण्याची जबाबदारी समताने घेतली आहे.

**५) डेबीट व क्रेडीट कार्ड :** समताचे ग्राहकांना डेबीट व क्रेडीट कार्ड सुविधा देण्यात येत असून रत्नाकर बँकेच्या सहकार्याने व्हीसा डेबीट व क्रेडीट कार्ड सुविधा देखील सुरु केली आहे. या सुविधेअंतर्गत समताच्या सर्व खातेदारांना डेबीट व क्रेडीट कार्ड देण्यात येईल या कार्डांच्या आधारे समताचा ग्राहक छोटी मोठी खरेदी करू शकेल. दैनंदिन बचतखाते असलेल्या खातेदारांना देखील या योजनेचा लाभ मिळेल. तसेच सादर डेबीट कार्डवरून भारतातील कोणत्याही एटीएम मधून रक्कम विड्रॉल करता येईल ऑनलाईन पेमेंट, टॅक्स भरणा इत्यादी देखील या कार्डवरून करता येईल या प्रणालीद्वारा समताच्या ग्राहकाच्या खात्यात जमा पैसे हे कार्ड दुकानदाराचे पॉझ टर्मिनलवर स्वाईप करताच ग्राहकांच्या खात्यातील रक्कम दुकानदारांचे खात्यात त्याच मिनिटाला जमा होईल. रोख रकमेची जोखीम न घेता बाजारात खरेदी करता येईल व समताचे खात्यात जमा रकमेवर व्याज ही मिळेल. रोख रकमेची गरज भासल्यास दुकानदाराकडून २४७ दिवस रोख रक्कम मिळण्याची सुविधा या योजनेत आहे. समताच्या दैनंदिन बचतठेव खातेदार समतामध्ये प्रत्यक्षात न येता देखील डेली कलेक्शन एजंटकडून किंवा समताचे पॉझ टर्मिनल असलेल्या दुकानदाराकडून पैसे उपलब्ध करून घेवू शकतो. अशा पद्धतीने समताच्या कार्यप्रणालीमध्ये बदलत्या काळानुसार अत्याधुनिक तंत्रज्ञान आणून संस्थेला जास्तीत जास्त सुरक्षितता व ग्राहकांना जास्तीत जास्त गतीमान सेवा देण्याचा खात्रीपूर्वक प्रयत्न समता करीत आहे.

६) **नेटबँकींग :** आजच्या गतीमान युगात ग्राहकांना संस्थेत येण्यास वेळ नसतो अशा ग्राहकांना घरबसल्या इंटरनेटद्वारे २४ तास आणि आठवड्यातील ७ दिवस आपले खाते बघता येईल तसेच सदर खात्यावरून आरटीजीएस, एनईएफटी द्वारे भारतात कोठेही रक्कम वर्ग करता येईल, ठेव पावती करता येईल, रिकरिंगचे हप्ते भरता येतील. अशा प्रकारे नेटबँकींगद्वारा विविध सेवा सुविधांचा लाभ ग्राहकांना मिळेल

७) **किऑस्क योजना :** आपल्याकडे नेट बँकींग नसल्यास संस्थेत आल्यानंतर आपले खाते तसेच संस्थेच्या सोयी सुविधा इत्यादी बाबतीत एका स्क्रीनवर आपण स्वतःच पाहू शकतात. त्यासाठी कोणत्याही मदतीची गरज नाही. आपले खाते आपणच पाहू शकतात. तसेच रोख रक्कम भरणेसाठी चलन न भरता समतात येवून मशीनद्वारा आपल्या खात्यावर २४ तास कधीही रक्कम जमा करून जमा पावती मशीनद्वारे मिळू शकते. पेपरलेस ऑफीस करण्याच्या दिशेने समताने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

**८) आर टी जी एस/एन ई एफ टी :** ग्राहकांनी समता पतसंस्थेत आपल्या नावाने खाते उघडण्यास बचत खात्याबरोबरच त्याला एटीएमकार्ड तसेच नेटबँकींग, एसएमएस बँकींग सुविधांबरोबर आपल्या पतसंस्थेतील खात्यात भारतातून कोणत्याही बँकेतून आपल्या खात्यावर आरटीजीएस/एनएफटी द्वारा रक्कम जमा करता येईल. यापुढे आरटीजीएस / एनईएफटी साठी राष्ट्रीयीकृत वा प्रायव्हेट बँकेत मोठी रक्कम खात्यावर बिनव्याजी शिल्लक ठेवून खाते उघडण्याची गरज नाही केवळ एक बचत खाते समतामध्ये उघडल्यास कोणतेही चार्जेस न देता व्याजासह अनेक सुविधांचा लाभ ग्राहकांना मिळेल.

**९) मोबाईल बँकींग :** समताच्या ग्राहकांना आपल्या स्मार्ट फोनवर समताचे ॲप्लीकेशन गुगल प्लेवरून डाऊनलोड करून फोन वरून आपल्या खात्यावर रक्कम वर्ग करणे, आरटीजीएस/एनईएफटी द्वारे खातेवर व्यवहार करणे खाते चेकींग करणे, स्टेटमेंट डाऊनलोड करणे अशी कामे करता येतील.

**१०) व्हिडीओ कॉन्फरन्स :** समता विविध शाखांमधील ग्राहकांना त्यांचे कामासाठी मुख्य कार्यालयात न येता आपापल्या शाखेत बसूनच मुख्य कार्यालयातील पदाधिकारी व अधिकाऱ्यांची व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे समोरासमोर बोलता येणार आहे. तसेच शंकानिरसन करून घेता येईल. संचालक मंडळाच्या सभेत शाखा व्यवस्थापक ज्या त्या शाखेत बसून सहभागी होतील.

**११) फोनद्वारे रोखभरणा सुविधा :** मुदत ठेव पावती तसेच कर्जभरणा करण्यासाठी आता समतात येण्याची गरज नाही कारण समताचे प्रतिनिधी आपली रक्कम समता पतसंस्थेत आणण्याची जोखीम घेणार आहेत. समता पतसंस्थेचया टोल फ्री नंबरवर कॉल केल्यानंतर काही वेळातच समताच्या प्रतिनिधी स्वतः आपणाकडे येवून आपणाकडून रक्कम स्वीकारून एसएमएस द्वारे त्याची पावती देवून मूळ पावत्या काही वेळात आपणाकडे पोच करेल.

**१२) रिकव्हरी कंट्रोलरूम :** कठोर, कायदेशीर वसुली हे समताच्या यशाचे गमक असून समताचा वसुली पॅटर्न महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. या वसुली पॅटर्न प्रभावी अंलबजावणीसाठी ऑनलाईन रिकव्हरी कंट्रोलरूमची निर्मिती नूतन वास्तूत करण्यात आली असून त्याद्वारा समताच्या कोणत्याही शाखेतील कर्जदारास एक हप्ता थकला तरी पत्र वा एसएमएस द्वारा तात्काळ सुचना देण्याची ऑटोमॅटीक व्यवस्था आहे. यापुढे समताची वसुली अत्याधुनिक प्रणालीद्वारा केली जाईल. यापूर्वी कारवाईच्या नोटीसा ठराविक मुदतीत न गेल्यास कर्मचारी अधिकारी यांना प्रती रोज दंड करण्याची तरतूद होती तसेच या कारवाईमध्ये पदाधिकाऱ्यांनी हस्तक्षेप केल्यास पदाधिकाऱ्यांवर सुद्धा दंडाच्या कारवाईची तरतद केलेली आहे.

**१३) अत्याधुनिक रेकॉर्डरूम :** रेकॉर्ड रूम ऑप्टीमायझर तंत्रप्रणालीचा वापर करून तयार करण्यात आलेले आहे. या यंत्रणेद्वारे कितीही वर्षापूर्वीची फाईल केवळ २ मिनिटात मिळेल तसेच जूने रेकॉर्ड व्यवस्थित सांभाळता व हाताळता येईल.

**१४) रेड कार्पेट सुविधा :** विशेष ग्राहक योजनेद्वारा ठराविक वर्षेसातत्याने ठेवीदार असणाऱ्या ठेवीदारांना रेड कार्पेट सुविधा दिली जाईल. त्यासाठी स्वतंत्र विभाग कार्यान्वि करण्यात आला आहे.

**१५) घरपोहोच लॉकर सुविधा :** ग्राहकांना घरपोहोच लॉकरचाही लाभ मिळणार असून समतात लॉकर असलेल्या ग्राहकांना लॉकर सेवेसाठी त्यांचे निवासस्थानापासून आणणे पोचविणेसाठी खास वाहन व सिक्युरिटी सेवा उपलब्ध करून देण्यात आली असून ग्राहकांचे मागणीनुसार लॉकरमध्ये ठेवलेल्या वस्तुंच्या चोरी, घरफोडी या जोखमींचा विमादेखील उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**१६) जनमंगल ठेव योजना :** दैनंदिन बचतठेव घेण्यासाठी समताचा प्रतिनिधी आपणाकडे येईल. आपली रक्कम स्वीकारून आपणास पावती न देता आपल्या मोबाईलवर रक्कम स्वीकारण्याचा एसएमएस येईल व आपली रक्कम स्विकारलेली रक्कम त्वरीत त्याचवेळी ऑनलाईन ग्राहकाचे खाती जमा होईल.

सामाजिक बांधीलकी व समाजकार्याचा भाग म्हणून समताने कापरगांव शहरातील नागरिकांसाठी अत्यल्पसेवा दर्शन एटीएम सेवेच्या माध्यमातून मिनरल वॉटरचा पुरवठा सुरु केला आहे. एटीएममधे १ रुपयाचे नाणे टाकून २ लीटर पाणी तसेच ५ रुपयाचे नाणे टाकून २० लीटर पाणी मिळते. सध्या दूषित पाण्यामूळे आरोग्याच्या विविध समस्यांना मोठ्या प्रमाणावर तोंड द्यावे लागते. नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे या सामाजिक बांधीलकीच्या उद्देशाने हा प्रकल्प राबवून समाज ऋण फेडण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे.

त्याच बरोबर समता पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी दरवर्षी भरघोस पगारवाढ, बोनस, ग्रॅच्युएटी प्रो.फंड यासोबत समता सेवक सेवानिवृत्ती आधार योजना, भोजन, विश्रांतीगृह, व्यायामगृह, अभ्यासिका आदी सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

याशिवाय समताच्या ग्राहकांसाठी वीजबील भरणाकेंद्र, आयकर भरणा, मुद्रांक शुल्क सुविधा, विमान तिकीट बुकींग सुविधा, वेस्टर्न मनी ट्रान्सफर, बस तिकीट बुकींग, विविध रिचार्ज यासारख्या सुविधांसह समताच्या ग्राहक व सभासदांच्या आरोग्यासाठी जगप्रसिद्ध पतंजलीची औषधे व जीवनावश्यक वस्तू माफक दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**समताचा वेगळा उपक्रम :** ठेवीदारांना आयकराबाबत विविध शंका असतात. या शंकांचे निरसन आयकर तज्ज्ञांकडून करून देण्यासाठी समता पतसंस्थेत स्वतंत्र कक्षाची निर्मिती करण्यात आली असून या केंद्राद्वारा ग्राहकांच्या गुंतवणूक व आयकरासंबंधी शंकांचे निरसन केले जाईल.

तसेच सुरक्षित बेरोजगारांना लघुउद्योग सुरु करण्यासाठी उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांतर्फे कोणता उद्योग करावा व त्या उद्योगाची संपूर्ण माहिती देण्याचा उपक्रमही सुरु करण्यात आलेला आहे. होतकरू तरूण करू इच्छित असलेल्या उद्योगासाठी मशिनरी कोठे मिळेल, जागा कोठे उपलब्ध होवू शकेल एवढेच नव्हे तर इतरही व्यवसाय उद्योग उभारणीसाठी समता अर्थसहाय्य उपलब्ध करून देईल.

# समता पतसंस्थेच्या पेपरलेस कार्यालयाच्या उद्‌घाटन प्रसंगीची निवडक क्षणचित्रे



अभ्यासिकेचे उद्घाटन करताना सुगनचंदजी बंब, श्री. राजूदास जाधव, प्रकाशजी पोहरे, समताचे संचालक श्री. रामजकुमारजी बंब व मान्यवर.



'वाटचाल ३ दशकांची' पुस्तिकेचे प्रकाशन करताना श्री. प्रकाशजी पोहरे, नितीनदादा कोल्हे (संजीवनी एज्यु. सोसा.चे संचालक), जयंतरावजी ससाणे, समताचे काका कोयटे व मान्यवर.




कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आ. जयंतरावजी ससाणे यांचे स्वागत करताना समताचे व्हा. चेअरमन रामचंद्रजी बागरेचा



बुलढाणा अर्बन क्रेडिट सोसायटीचे संस्थापक चेअरमन राधेशामजी चांडक यांचे स्वागत करताना ज्येष्ठ संचालक मोहनशेठजी झंवर



पेपरलेस कार्यालय शुभारंभप्रसंगी मनोगत व्यक्त करताना रामबिलाजी मुंदडा



मनोगत व्यक्त करताना प्रकाशजी पोहरे



मा. सुनीलशेठ रुकारी मनोगत व्यक्त करताना



मनोगत व्यक्त करताना राधेश्यामजी चांडक



कार्यक्रमात सहभागी सौ. सुहासिनीताई कोयटे, सौ. मीना व्यास व सौ. ज्योत्स्ना पटेल.



शिवकृपा पतसंस्थेचे चेअरमन श्री वंजारीसाहेब यांच्याशी बातचीत करताना जन. मॅनेजर सचिन भट्टड



पदवीधर मतदारसंघाचे आ. डॉ. सुधीरजी तांबे कॅश डिपॉझिट मशीनची पाहणी करताना. सोबत समताचे संचालक जितेंद्रभाई शहा, अभिनेते चंद्रकांत शिंदे व मान्यवर



पो. नि. श्री. साजनजी सोनवणे यांचे स्वागत करताना समता पतसंस्थेचे नूतन संचालक श्री. संदीप कोयटे